पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 15/11/2019 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

1) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 10 किमी. अंतरावर कोच्छी पुनवर्सन नवीन बसस्टॉप बडेगाव रोड येथे दिनांक 14/11/2019 चे 11.00 वा. ते 12:00 वा. दरम्यान खापा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन खापा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एमएच–31/सीक्यू–7306 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी क्र. 1) मनिषा निलकंठ माटे, वय 33 वर्ष, रा. टेकानाका, नागपूर व 2) झाकीर खान जाबीर खान कुरेशी, वय 24 वर्ष, रा. कामगार नगर, नागपूर हे दोघेही त्यांच्या ताब्यातील वाहनात एकूण 33 जनावरे (गायी,गोऱ्हे) कि. 6,00,000/–रू. निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन वाहनासह एकूण किंमती 26,00,000/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे सहायक फौजदार श्री. मुकुंदा लांदे, पो.स्टे. खापा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे वरील आरोपींविरुध्द कलम 429, 34 भादवी तसेच सहकलम 11 (1), (घ), (ड), (च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक अधिनियम सहकलम 5 (अ) महाराष्ट्र प्राणी सरंक्षण अधिनियम कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री. झांबरे 9028748409 हे करीत आहे.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)

2) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 28 किमी. अंतरावर मौजा गुमगाव शिवार येथे दिनांक 13/11/2019 चे 20.00 वा. ते 21:05 वा. दरम्यान जलालखेडा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन जलालखेडा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम.एच–27/एक्स–6906 क्रमांकाचा बोलेरो पिकअप गाडीचा चालक आरोपी क्र. 1) मन्सुर अली नुर अली, वय 28 वर्ष, 2) अजीज हसन शेख, वय 30 वर्ष, दोन्ही रा. बालाजी वार्ड आर्वी, जि. वर्धा व 3) शबीर शेख शेख गणी, वय 45 वर्ष, रा. लोहार सावंगा, ता. नरखेड यांनी त्यांच्या वाहनामध्ये एकूण 6 जनावरे (गायी,गोऱ्हे) कि. 43,000/–रू. निर्दयतेने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन वाहनासह एकूण किंमती 6,93,000/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे सहायक पोलिस निरीक्षक श्री. सोनटक्के, पो.स्टे. कुही यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे वरील आरोपींविरुध्द कलम 11 (1), (ड), (ई) (एफ) 9 प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक अधिनियम कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरूण कावळे 7020212196 हे करीत आहे.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)

## घरफोडी

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 08 कि.मी. अंतरावर मौजा तिनखेडा येथे दिनांक 14/11/2019 चे 13.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रमेश नागोराव चापले, वय 51 वर्ष, रा. तिनखेडा यांचे घराच्या दाराचे अज्ञात आरोपीने कुलूप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 15,000/–रू. व नगदी कि. 25,000/–रू. असा एकुण 40,000/–रू. चा मुद्देमाल तसेच फिर्यादीच्या शेजारी राहणारे ज्ञानेश्वर बालपांडे यांचे घरातील लोखंडी कपाटातील ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 12,000/– रू. व नगदी 1,000/–रू. असा एकुण कि. 53,000/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपी विरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री. खुटेमाटे 9673803224 हे करीत आहे.

## चोरी

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 05 कि.मी. अंतरावर कामठी कॉलरी नया फिल्ड येथे दिनांक 13/11/2019 चे 09.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे – संतोष इंद्रासन यादव(सेक्युरिटी गार्ड), वय 36 वर्ष, रा. कामठी कॉलनी क्वार्टर क्र. 527 हे वेकोली येथे पेट्रोलिंग करीत असतांना कामठी कॉलरी नया फिल्ड आवार येथे आरोपी नामे– रमेश भोलाप्रसाद कश्यप, वय 35 वर्ष, रा. बांधा दफई खदान क्र. 6, कन्हान याने उभे असलेल्या 155 डोजर मशीन मधुन याने 30 लिटर डिझल कि. 2040/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी विरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार येशु जोसेफ हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 15 कि.मी. अंतरावर भरतवाडा येथे दिनांक 13/11/2019 चे 11.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे – आकाश हवालदार तिवारी, वय 30 वर्ष, रा. हनुमान नगर भरतवाडा यांच्या घरासमोर असलेले सार्वजनीक हनुमान मंदीराच्या मुर्तीवरील चांदीचा मुकुट व हनुमान मुर्तीच्या हाता व पायातील 4 चांदीचे कडे कि. 30,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी विरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ देवेन्द्र सोनावले हे करीत आहे.

3) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावर भरतवाडा येथे दिनांक 13/11/2019 चे 17.00 वा. ते दिनांक 14/11/2019 चे 07.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे – सुरेन्द्र अन्नाजी वाघमारे, वय 62 वर्ष, रा. चंडिका वार्ड काटोल याने त्याच्या मालकीचे शेतातील गोठयामध्ये दाव्याला बांधुन ठेवलेले दोन बैल कि. 30,000/–रू. चे अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी विरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरूण भेंडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर